**महाराष्ट्र शासन**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

७ वा मजला, बेलापूर भवन, सेक्टर-११, सी.बी.डी बेलापूर,

नवी मुंबई- ४००६१४, दुरध्वनी क्र.०२२-२७५६०१४५

**ई-मेल**-dmainfo5@gmail.com **WebSite**- https://mahadma.maharashtra.gov.in


**जावक क्र.नपप्रसं-२०२६/ कक्ष-३/संवर्ग कर्म/संघ बै इ/अंशदान**/487 **दिनांक**- 21 JAN 2026

**संदर्भ** :-

१. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७५अ चे पोट कलम (१), (२) व (६)
२. **मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, महाराष्ट्र मुंबई (AG Office)** यांचे पत्र क्र.PAI/Forse/ ६०४७३३०८/Gist १३६३९/६०३५२९५४ दि. १७.०५.२०१३
३. संचालनालयाचे आदेश क्र.नपप्रसं-२०२४/कक्ष-३/संवर्ग कर्म.आस्था/प्र.क्र.४/८५९ दि. ०७ फेब्रुवारी, २०२४
४. संचालनालयाचे पत्र क्र. नप नपप्रसं-२०२५/कक्ष-३/संवर्ग कर्म/संघ बै इ/अंशदान/२९२७ दि.२७ मार्च, २०२५

## -: परिपत्रक :-

संचालनालयाचे आदेश दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४ मधील परिच्छेद ४ (अ) मध्ये निवृत्तीवेतन अंशदान व रजा वेतन अंशदान बाबत विस्तृत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. संचालनालयाचे आदेश असून देखील काही नगरपरिषदा / नगरपंचायती येथे ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अंशदान भरताना संदिग्धता निर्माण करून ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या महाराष्ट्र नगरपरिषद राज्य सेवा संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे रजा वेतन अंशदान विहित वेळेत शासनास भरणा होत नसल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

सबब, सदर आदेशातील परिच्छेद ४(अ) बाबत सविस्तर सूचना देण्याचे संचालनालयाच्या विचाराधीन होते. संचालनालयाचे आदेश दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४ मधील परिच्छेद ४ (अ) मध्ये नमूद निवृत्तीवेतन अंशदान व रजा वेतन अंशदानबाबत सूचना पुढीलप्रमाणे :-

१. **१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासकीय सेवेत नियुक्त** झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू असल्याने कार्यरत कालावधीतील –

   i. **निवृत्तिवेतनाचे अंशदान,** द्यावयाच्या मासिक अंशदानाचे दर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे याच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या परिशिष्ट- चार मधील नियम ६ च्या पोटनियम (१) मध्ये प्रस्तावनेतील शासन निर्णय, दिनांक ०१.१०.१९८३ अन्वये विहित केलेल्या तक्त्यात नमूद केलेल्या दराने.

   ii. **रजावेतनाचे अंशदान,** द्यावयाच्या मासिक अंशदानाचे दर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या परिशिष्ट-चार मधील नियम ६ च्या पोटनियम (२) मध्ये विहित केल्यानुसार स्वीयेतर सेवेमध्ये मिळणाऱ्या वेतनाच्या ११% (अकरा टक्के) इतके राहील.

२. **१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्त** झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ मधील परिच्छेद ५ (ब) येथे नमूद केलेप्रमाणे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

तथापि, ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ लागू होणार नसल्याबाबत कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ हे जसेच्या तसे लागू असल्याने त्यांना कार्यरत कालावधीतील-—

i. **रजावेतनाचे अंशदान,** द्यावयाच्या मासिक अंशदानाचे दर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या परिशिष्ट-चार मधील नियम ६ च्या पोटनियम (२) मध्ये विहित केल्यानुसार स्वीयेतर सेवेमध्ये मिळणाऱ्या वेतनाच्या ११% (अकरा टक्के) इतके राहील.

३. **मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र दि.१७.०५.२०१३** अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद राज्य सेवा संवर्गातील कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान वर्गणीचा भरणा कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करावे व कशाप्रकारे गणना करावी याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदानचे लेखाशीर्ष**

i ) मुख्य लेखाशिर्ष **निवृत्तीवेतन अंशदान** जमा करणे, (जमाशिर्ष)
००७१ - निवृत्ती वेतन व इतर निवृत्ती वेतन लाभ
१०१- अंशदाने व अभिदाने

ii) मुख्य लेखाशिर्ष **रजावेतन अंशदान** जमा करणे (जमाशिर्ष)
०२१७ - नगर विकास
८०० - इतर जमा
(०१) (०६) - रजा वेतन अंशदान
०२१७०१५२

सबब, आपल्या नगरपरिषदेमध्ये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गात पूर्वी कार्यरत असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या-

अ. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासकीय सेवेत नियुक्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन अंशदान व रजा वेतन अंशदान वर्गणी आणि

आ. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्त कर्मचाऱ्यांचे रजा वेतन अंशदान वर्गणी भरणेबाबत सदरहू पत्रात नमूद केल्याप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच, वर्गणी भरलेबाबतचा अहवाल विनाविलंब संचालनालयास पाठविण्यात यावा.

**(मा.आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने)**

M.Patil

**(डॉ. नीलम पाटील)**
**उपायुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई**

**प्रत** :- १. . विभागीय सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
३. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)